# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) (द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**( परीक्षा व मुल्यमापन मंडळ)**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३१०४


जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/3516/२०२० दि. 99/१०/२०२०

## अधिसुचना

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील सर्व प्राचार्याना कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्र २०१९–२० मधील उन्हाळी–२०२० च्या पदवी/पदव्युत्तर वर्गाच्या अंतीम वर्षातील/अंतिम सत्रातील विद्यार्थी तसेच अंतिम सत्रातील ज्या विद्यार्थ्याचे बॅकलॉग विषय असतील अश्याच विद्यार्थ्याची परीक्षा दि. १२/१०/२०२० पासून ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पध्दतीने सुरू होणार आहे. ऑनलाईन परीक्षेकरिता प्रत्येक विद्यार्थ्याना युजरआयडी(PRN) व पासवर्ड (नोंदणीकृत मोबाईल नबंर) विद्यार्थ्याच्या मोबाईल नंबर वर sms द्वारे पाठविण्यात आलेले आहे व विद्यार्थ्यानी ऑनलाईन परीक्षा देतांना वारंवार लॉगीन करू नये तसेच पेपर देताना काही समस्या निर्माण झाल्यास घाबरून जावू नये. कारण परीक्षा देण्याकरिता पुरेसा वेळ देण्यात आलेला आहे तसेच परीक्षा देत असतांना मोबाईल वरील इतर विंडो बंद ठेवण्यात याव्यात, तसेच परीक्षा सुरू असतांना मोबाईल वर कोणताही कॉल स्विकारू नये. सर्व विद्यार्थ्यानी Mock test देणे आवश्यक आहे. सदर Mock test आज दि. ११/१०/२०२० रोजी रात्री ११.३० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. काही कारणांनी विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नाही, तर अशा विद्यार्थ्यांनी आपल्या प्राचार्या मार्फत आपली तक्रार नोंदवावी, जेणेकरून विद्यार्थ्यांना पुढील परीक्षा उपलब्ध करून देणे सोयीचे होईल. मा. प्राचार्यांनी आपल्या स्तरावर सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास ही बाब आणुन दयावी.

11/10/2020

(डॉ. अनिल झेड. चिताडे)

संचालक

परीक्षा व मुल्यमापन मंडळ

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली